सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, १४ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलरची बनवणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी : मुंबई, दि.१३ डिसेंबर : महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी विविध विकास धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्याची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलरची बनवणार आहोत. गेल्या वर्षी राज्याने अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केले आहे. आता २०२८ ते २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करु, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. वांद्रेतील बीकेसीतील जिओ वर्ल्ड कन्वेंशन सेंटर येथे ही परीषद १३ ते १४ डिसेंबर दरम्यान चालणार आहे.

यावेळी आमदार मंगलप्रभात लोढा, वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक स्वामी विद्यानंद, अध्यक्ष राजेश शर्मा, प्रमुख वक्ते पद्मश्री टी. व्ही. मोहनदास पै, सहसचिव शैलेश त्रिवेदी यासह जगातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहेच मात्र भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक परिषदेने भारताची संस्कृती आणि विविध क्षेत्रातील विकास तत्वावर आधारित वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. पाश्चिमात्य आणि आपल्या संस्कृतीमध्ये मूलभूत अंतर आहे. पाश्चिमात्य संस्कृतीत जो सक्षम आहे तोच विकास करू शकतो मात्र, आपल्या संस्कृतीमध्ये जन्मलेला प्रत्येक व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आणि अधिकार आहे .

भारताच्या नेत्रदीपक प्रगतीने सर्व जगाला थक्क करून टाकले आहे. सर्वाधिक गतीने पुढे येणारा भारत जगात तिसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे. जगातील लोक म्हणत होते की, एवढ्या मोठ्या लोकसंख्येचा देश कशाप्रकारे प्रगती करू शकतो? परंतु देशातील कुशल मनुष्यबळ हेच विकासाचे महत्त्वाचे साधन असून प्रत्येकाला विकासामध्ये सोबत घेऊन जात आहोत ,असे सांगून ते म्हणाले,'महाराष्ट्र आज मोठ्या गतीने पुढे जात आहे. राज्यातील देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी सल्लागार कमिटीची स्थापना केली असून यामाध्यमातून महाराष्ट्र कोणकोणत्या क्षेत्रात पुढे जाऊ शकतो, याचा अभ्यास करुन यावर आधारित विकासाची धोरणे आखली जात आहेत. जागतिक पातळीवरती महाराष्ट्र विकासाला पूरक एक साखळी बनवत आहे. यामध्ये लॉजिस्टिक धोरण, सर्वाधिक गतिमान रस्त्यांचे जाळे बनवण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. नागपूर - मुंबई समृद्धी महामार्ग ७०० किलोमीटर असून जो १६ जिल्ह्यांना जोडला आहे. हा महामार्ग थेट जेएनपीटी या बंदराला जोडला आहे, यातून अत्यंत चांगल्या पुरवठादारांची साखळी निर्माण होत आहे, रस्ते, विमान वाहतूक, बंदर विकास या पायाभूत सुविधा सक्षम करण्यावर राज्य शासन भर देत आहे. देशासोबतच महाराष्ट्राला मेरीटाईमची ताकद बनवण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ध्यास आहे. २०१४ पासून त्यांच्या नेतृत्वाखाली देशात पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाला गती दिली आहे, देशाच्या विकासाला गती देणारी नवीन धोरण बनवले आहेत. भारताने गेल्या दहा वर्षात २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेवरती आणले आहे. २०३० पर्यंत भारताला ५ ट्रिलियनची अर्थव्यवस्था बनवणार आहोत. हे उद्दिष्ट आम्ही २०२८ पर्यंतच पूर्ण करू. जागतिक पातळीवरील आर्थिक संस्थांच्या माध्यमातून भारत देश सात ट्रिलियन इकॉनॉमीचे किंवा ९ ट्रिलियनचेही उद्दिष्ट गाठू शकतो असे सर्वेक्षण समोर येत आहे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावरती आधारित विकासावर अधिक भर देण्यात येत आहे. सन २०२० च्या देशपातळीवरील विकास सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र देशात भू-जल पातळीमध्ये देखील प्रथम होते. राज्यातील वनांचे आच्छादन देखील जास्त आहे. ग्रीन ऊर्जा, नदीजोड प्रकल्प यातून शाश्वत विकासावरती राज्य शासन भर देत आहे असेही फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी टी. व्ही. मोहनदास पै म्हणाले की, देशामध्ये उपलब्ध मनुष्यबळ हे आपल्या विकासाचे बलस्थान आहे. विकसित भारत हेच भारताचे भवितव्य आहे. भारतीय संस्कृती हा विचार आहे तो जगात पुढे नेणे गरजेचे आहे. युवांना उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देणे, आरोग्य, शिक्षण, डिजिटल तंत्रज्ञान, महिला सबलीकरण यावरती काम होणे गरजेचे आहे. भारताला जगातील महसत्ता बनवण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी महत्वाच्या आहेत हे विकासाचे अनेक पैलू त्यांनी मांडले.

## भाजपाचे १२ जानेवारीला शिर्डीत प्रदेश अधिवेशनाला आमित शाह, नड्डा उपस्थित राहणार : चंद्रशेखर बावनकुळे

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१३ डिसेंबर : भारतीय जनता पार्टीचे शिर्डी (जि. अहिल्यानगर) येथे नव्या वर्षात स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनी १२जानेवारीला प्रदेश अधिवेशन होणार आहे. त्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी दिली.

स्वामी विवेकानंद यांची जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र प्रदेश भाजपाने एक मोठा उपक्रम हाती घेतला आहे. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित हे अधिवेशन असेल. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांनुसार युवकांना प्रेरित करून भाजपाकडे आकर्षित करण्यासाठी या वेळी नवीन अभियानाची सुरुवात होणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा या अधिवेशनात भव्य सत्कार केला जाणार आहे.

शिर्डी येथील अधिवेशनासाठी राज्यभरातून सुमारे १० हजार भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. तरुणाईशी संपर्क वाढविण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येणार असल्याने हे अधिवेशन भाजपाच्या आगामी काळातील योजनांसाठी महत्त्वाचे असेल, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

# मंत्रिमंडळ विस्तार उद्या नागपुरात होणार; खाते वाटपाबाबतची उत्सुकता शिगेंला!

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई : हिवाळी अधिवेशनापूर्वी राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तार होणार असला तरी त्याबाबत अद्याप सस्पेन्स कायम आहे. शनिवारी मंत्र्यांचा शपथविधीच्या शक्यतेने राजभवनात तयारी करण्यात आली होती.मात्र त्याऐवजी आता १५ डिसेंबरला दुपारी चार वाजता नागपुरातच शपथविधी घेण्यात येणार आहे, अशी माहिती विश्वासनीय सूत्रांकडून सांगण्यात आली.

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा फॉर्मुला दिल्लीतील नेत्यांनी सध्या त्याची अधिकृतपणे घोषणा झालेली नाही त्याचबरोबर मंत्रिमंडळात कोणा कोणाची वर्णी लागणार याबाबत अनेक जावे केले जात असून तिन्ही पक्षाच्या इच्छुकांचे जोरदार लॉबी सुरू आहे.

सोमवारपासून हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे.

### शिवसेनेचे संभाव्य कॅबिनेट मंत्री

एकनाथ शिंदे, उदय सामंत, शंभुराज देसाई, दादा भुसे, प्रताप सरनाईक, संजय शिरसाट , गुलाबराव पाटील, भरत गोगावले, संभाव्य राज्यमंत्री, योगेश कदम, विजय शिवतारे, राजेंद्र यड्रावकर किंवा प्रकाश आबिटकर.

त्या पार्श्वभूमीवर आमदारांची सोय व्हावी, या उद्देशाने शनिवारऐवजी रविवारी मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याची माहिती आहे. यंदा भाजपकडून जास्तीत जास्त नव्या चेहऱ्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, भाजपचे २१,शिवसेनेचे १२ आणि राष्ट्रवादीचे १० मंत्री शपथ घेणार आहेत. त्यामध्ये कॅबिनेट आणि राज्यमंत्रिपदाचा समावेश आहे. या मंत्रिपदाची संभाव्य नावे समोर आली आहेत. मात्र, ऐनवेळी त्यामध्य काही बदलही होण्याची शक्यता आहे. १६ तारखेपासून विधीमंडळाचे अधिवेशन असल्यामुळे १५ तारखेला नागपुरात शपथविधी होऊ शकतो, अशी विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे, मुंबईतील राजभवनऐवजी आता नागपुरातच तयारीला सुरुवात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, नागपुरात पहिल्यांदाच मंत्रिमंडळ विस्तार होऊ शकतो.

**राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून लॉबिंग**

दरम्यान, अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १० मंत्रिपदं देण्यात येणार असून त्यामध्ये८ कॅबिनेट तर २ राज्यमंत्रिपदं असणार आहेत. त्यासाठी आता नेत्यांनी लॉबिंग सुरू केल्याचं चित्र आहेत. माजी मंत्री हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील यांनी अजित पवारांची देवगिरी निवासस्थानी भेट घेतली. तर त्याआधी धर्मराव बाबा अत्राम यांनीही अजित पवारांची भेट घेतली होती. त्यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे उपस्थित होते.


## जालना शहर महानगरपालिका, जालना

भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना अंतर्गत



आमदार अर्जुनरावजी खोतकर यांचा विशेष प्रयत्नातुन मंजुर एकुण ६७.०० कोटी रूपयाच्या विकास योजनेतील कामांपैकी

| | वेळ |
|---|---|
| १) आय टी आय पाण्याची टाकी ते मारोती मंदीर चौक १८.०० मी.रूंद विकास चा रस्ता तयार करणे. अंदाजीत रक्कम रू.३.४९ कोटी | सकाळी ११.०० वा. |
| २) रेल्वे गेट ते मॉं किराणा १५.०० मी रूंद विकास योजना रस्ता तयार करणे, अंदाजीत रक्कम रू.२.५० कोटी . | सकाळी ११.३० वा. |
| ३) पेशवे चौक ते लक्कडकोट पुलापर्यंत १२.०० मी.रूंद विकास योजना रस्ता तयार करणे. अंदाजीत रक्कम रू.१.१० कोटी | सकाळी १२.०० वा. |
| ४) श्रीजी ढाबा ते शकुंतला नगर पर्यंत १५.०० मी रूंद विकास योजना रस्ता तयार करणे. अंदाजीत रक्कम रू.२.०६ कोटी | सकाळी १२.३० वा. |



### कामांचा उद्घाटन सोहळा

मा.आमदार श्री.अर्जुनरावजी खोतकर
विधानसभा सदस्य, जालना

अभिमन्यु खोतकर — युवा सेना, सचिव
पंडितराव भुतेकर — शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख
भाऊसाहेब घुगे — शिवसेना जिल्हाप्रमुख
गणेश सुपारकर — शिवसेना उपजिल्हाप्रमुख
विष्णुभाऊ पाचफुले — शिवसेना शहरप्रमुख
आत्मानंद भक्त — शिवसेना शहरप्रमुख

यांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवार, दिनांक १४/१२/२०२४ रोजी संपन्न होत आहे.

विनीत

सय्यद सऊद (शहर अभियंता) जालना शहर महानगरपालिका
नंदा गायकवाड (उपायुक्त) जालना शहर महानगरपालिका
संतोष खांडेकर (आयुक्त तथा प्रशासक) जालना शहर महानगरपालिका

सौजन्य :- शुभम कंन्स्ट्रक्शन, जालना, मे.एस.जी.देविदान ईन्फ्रा प्रा.लि.जालना, मे.विजय आदमाने जालना



ICICI Lombard



प्रधानमंत्री पीक विमा योजना
Agriculture Department Government of Maharashtra

रब्बी २०२४-२०२५

## पीक विमा काढा आणि सुरक्षा कवच मिळवा

"आपल्या विमा हप्त्याचा राज्य सरकारने उचलला भार, प्रति अर्ज १ रुपया देऊनी आजच नोंदवा आपला सहभाग"

नोंदणीकरता किंवा पी.एम.एफ.बी.वाय बाबत अधिक माहितीसाठी संपर्क साधा — बँक | सीएससी केंद्र | क्रॉप इन्शुरन्स ॲप | विमा मध्यस्थ | पोस्ट ऑफिस

सन २०२३ - २४ पासून "सर्वसमावेशक पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने शेतकरी हिस्स्याची विमा हप्ता रक्कम राज्य शासनामार्फत भरण्यात येणार आहे. त्यामुळे शेतक-यांना केवळ १/- रुपया भरून योजनेतील सहभागाची नोंदणी करता येईल. पिक विमा योजनेत सहभागाची नोंदणी करण्यासाठी सामुहिक सेवा केंद्र (CSC) धारकास विमा कंपनी मार्फत प्रती अर्ज ४० रू अदा करत असल्याने शेतकऱ्यांना प्रति अर्ज रुपये १ रू व्यतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही.

| सहभागी होण्याची अंतिम तारीख | ३० नोव्हेंबर २०२४ | १५ डिसेंबर २०२४ | | ३१ मार्च २०२५ |
|---|---|---|---|---|
| अधिसूचित पीक | ज्वारी जिरायत | गहू बागायत | हरभरा | उन्हाळी भुईमूग |
| जिल्हा | विमा संरक्षित रक्कम (रुपये प्रति हेक्टर) | | | |
| परभणी | ३४,००० | ४२,००० | ३७,५०० | ४२,९७१ |
| नागपूर | २८,००० | ४२,५०० | ३६,२५० | अधिसूचित नाही |
| वर्धा | अधिसूचित नाही | ३८,००० | ३५,००० | अधिसूचित नाही |

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत कर्जदार शेतकऱ्यांचा सहभाग ऐच्छिक असून, योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास सहभागी न होण्या बाबत चे घोषणापत्र, योजनेत सहभागी होण्याच्या अंतिम मुदतीच्या ७ दिवस अगोदर कर्ज मंजूर केलेल्या बँकेत देणे आवश्यक आहे. म्हणजे बँक विमा हप्ता कपात करणार नाही.

१. भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरार पिक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधानकारक आहे.
२. स्थानिक नैसर्गिक आपत्ती आणि काढणी पश्चात नुकसाना मुळे बाधित विमाधारक शेतकऱ्याने घटना घडल्यापासून ७२ तासांच्या आत सूचना देणे १) PMFBY पीक विमा ॲप वर २) कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाईन टोल फ्री क्रमांकावर कॉल करणे, तक्रारीचा लेखी अर्ज ३) कृषी विभाग, ४) पीक विमा सुविधा केंद्र किंवा ५) बँक मध्ये देणे आवश्यक आहे. त्यामध्ये शेतकऱ्याचे नाव, पीक विमा पावती क्रमांक मोबाईल क्रमांक, आपत्तीचा प्रकार, बाधित पिकानुसार गट क्रमांक इत्यादी माहिती नमूद करून देणे आवश्यक आहे.

खालील बाबींसाठी संरक्षण देणे हा प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा उद्देश आहे.

१) प्रतिकुल हवामान घटकांमुळे पेरणी/लावणी/उगवण न होणे
हंगामातील अपूरा पाऊस, हवामानातील इतर घटकांच्या प्रतिकुल परिस्थितीमुळे केवळ अधिसूचित मुख्य पिकांची अधिसुचित क्षेत्रात व्यापक प्रमाणावर पेरणी/ लावणी होऊ न शकलेल्या क्षेत्रासाठी पेरणी / लावणी न झालेले क्षेत्र हे सर्वसाधारण पेरणी क्षेत्राच्या ७५ टक्के पेक्षा जास्त असल्यास विमा संरक्षण देय राहील.

२) हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान
हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत, मात्र सर्वसाधारण काढणीच्या १५ दिवस आधीपर्यंत पूर, पावसातील खंड, दुष्काळ इ. बाबींमुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षित उत्पादनामध्ये मागील लगतच्या ७ वर्षांच्या सरासरी उत्पादनाच्या ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर विमा संरक्षण देय राहील.

३) पिक पेरणीपासून काढणी पर्यन्तच्या कालावधीत पिकांच्या उत्पादनात येणारी घट
दुष्काळ, पावसातील खंड, पूर, क्षेत्र जलमय होणे, किड व रोगांचा व्यापक प्रादुर्भाव, भूस्खलन, नैसर्गिक आग, वीज कोसळणे, वादळ, गारपीट आणि चक्रीवादळ यासारख्या टाळता न येणाऱ्या जोखमींमुळे पिकांच्या उत्पादनात येणा-या घटीपासून व्यापक विमा संरक्षण दिले जाईल.

४) स्थानिक नैसर्गिक आपत्ती
या बाबी अंतर्गत गारपीट, भूस्खलन, विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास, ढगफूटी अथवा विज कोसळल्यामुळे लागणारी नैसर्गिक आग या कारणेसाठी नुकसान भरपाई देय आहे. स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत विमा संरक्षित क्षेत्राच्या २५ टक्के पेक्षा जास्त क्षेत्रावर एका आपत्तीमध्ये सूचना प्राप्त झाल्यास त्याचे वैयक्तिक सर्वेक्षण न करता रँडम सर्वेक्षण करणे व नुकसानीचे प्रमाणे निश्चित करून २५ टक्के अग्रीम देण्यात येईल.

५) काढणी पश्चात नुकसान
ज्या पिकांची काढणीनंतर शेतात पसरवून अथवा पेंढ्या बांधून सुकवणी करणे आवश्यक असते अशा कापणी/ काढणी नंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या अधिसूचित पिकाचे काढणीनंतर दोन आठवड्यांच्या आत (१४ दिवस) गारपीट, चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस आणि बिगरमोसमी पावसामुळे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देय आहे.

- जर अधिसूचित पिकाखालील बाधित क्षेत्र हे अधिसूचित मंडळातील एकूण विमा संरक्षित क्षेत्राच्या 25% पेक्षा जास्त असेल तर, स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत नोंदविलेल्या सर्व सूचना विस्तृत स्वरुपाच्या (wide Spread) मानल्या जातील.



PMFBY व्हाट्सॲप बॉट नंबर +91-7065514447

नोंदणीकृत आणि कॉर्पोरेट कार्यालयाचा पत्ता: आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लि., आयसीआयसीआय लोम्बार्ड हाऊस, ४१४. वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

पत्ता: तिसरा मजला, प्लॉट क्रमांक २४६, माणिकचंद आयकॉन, 'सी' विंग, बंड गार्डन पुणे, जिल्हा पुणे, पिन कोड ४११ ००१, महाराष्ट्र.

अधिक माहितीसाठी कृपया जवळच्या बँक शाखेशी / सी. एस. सी. केंद्राशी संपर्क साधा किंवा कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाईन टोल फ्री: १४४४७

जाहिरातीमध्ये ऑफर केलेल्या कव्हरचा फक्त एक संकेत आहे. जोखीम घटक अटी, शर्तींच्या आणि अपवर्जनांबद्दल अधिक तपशीलांसाठी, कृपया विक्री पूर्ण करण्यापूर्वी विक्री माहितीपत्रक / पॉलीसीचे शब्द काळजीपूर्वक वाचा. वर दाखवलेला ट्रेड लोगो आयसीआयसीआय बँकेच्या मालकीचा असून हा आयसीआयसीआय लोम्बार्ड जीआयसी लि.च्या लायसन्स अंतर्गत वापरण्यात येत आहे आणि लोम्बार्ड लोगो आयसीआयसीआय लोम्बार्ड जीआयसी लि.च्या मालकीचा आहे. आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय लोम्बार्ड हाऊस, ४१४, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५. टोल फ्री : १४४४७ | फॅक्स नं: ०२२ ६१९६१३२३. आयआरडीएआय नोंदणी क्रमांक ११५. सीआयएन: L67200MH2000PLC129408. ग्राहक सहाय्यता ईमेल: customersupport@icicilombard.com. वेबसाइट पत्ता: www.icicilombard.com. उत्पादनाचे नांव : प्रधानमंत्री पीक बीमा योजना. युआईएन: IRDAN115RPO001V01201617. ADV/22821